### रिओ पॅरालिम्पिक : उंचउडीत भारताचा डबल धमाका, वरुणसिंग भाटीला कांस्यपदक

# मरियप्पनची 'सुवर्ण' उडी



**रिओ :** रिओ ऑलिम्पिकमध्ये देशासाठी एकतरी सुवर्णपदक मिळवण्याचे भारतीय खेळाडूंचे स्वप्न अपूर्ण राहिले असले तरी ही कसर आता रिओ पॅरालिम्पिकमध्ये भरून निघाली आहे. मरियप्पन थंगवेलू याने पॅरालिम्पिकच्या दुसऱ्या दिवशी उंचउडी प्रकारात सुवर्णपदक पटकावले. याच प्रकारात तिसऱ्या स्थानावर राहिलेला उत्तर प्रदेशचा २१ वर्षांचा वरुणसिंग भाटी कांस्यपदकाचा मानकरी ठरला. तो एका पायाने पोलिओग्रस्त आहे.

मरियप्पन व वरुणच्या या कामिगरीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींसह सर्व भारतीयांनी त्यांचे अभिनंदन करीत त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

पाच वर्षांच्या वयात शाळेत जातेवेळी भरधाव बसने धडक देताच उजवा पाय गमावून बसलेल्या २१ वर्षांच्या थंगवेलूने १.८९ मीटर ऐतिहासिक उंच उडी घेत सुवर्ण जिंकले. या प्रकारात भारताला सुवर्ण जिंकून देणारा तो पहिला खेळाडू ठरला आहे. याआधी १९७२ च्या हेडेलबर्ग स्पर्धेत जलतरणात मुरलीकांत पेटकर तसेच २००४ च्या अथेन्स स्पर्धेत भालाफेकीत देवेंद्र झांझरिया याने भारतासाठी सुवर्णमय कामगिरी केली होती. विशेष म्हणजे या प्रकारात सुवर्णपदकाचा दावेदार मानला जाणारा अमेरिकेचा खेळाडू सॅम ग्रीव्ह याला मात्र (१.८६ मीटर) रौप्य मिळाले. महत्त्वाची बाब म्हणजे कांस्य पदक पटकावणारा वरुण भाटी याने सुध्दा १.८६ मीटर मीटर उंच उडी मारली. पण काऊंटबॅकमध्ये त्याला कांस्यवर समाधान मानावे लागले. टी ४२ गटात शरीराच्या खालच्या भागात अक्षमता, पायाची लांबी कमी असणे किंवा जोर नसणे आदी प्रकाराचा समावेश आहे. थंगवेलू याने दहाव्या प्रयत्नांत १.७७ मीटर उडी घेतली. पोलंडचा लुकास मामजाज, चीनचा झिकियांग झिंग आणि भाटी यांनी देखील १.७७ मीटर उडी घेतली. नंतरच्या प्रयत्नांत केवळ तीन स्पर्धक उरले होते. भाटीने १.८३ मीटर उडी घेताच सुवर्ण व रौप्य भारतालाच मिळेल, असे वाटत होते पण अमेरिकेच्या खेळाडूने १.८६ मीटर उंच उडी घेत पुन्हा एकदा लक्ष वेधले. रोमहर्षक फायनलमध्ये थंगवेलू याने १.८९ मीटर उडी घेत सुवर्णावर नाव कोरले. थंगवेलू आणि भाटी यांच्या कामगिरीनंतर पॅरालिम्पिकमधील भारतीय पदकांची संख्या दहा झाली आहे.

### मरियप्पनला तमिळनाडू सरकारचे दोन कोटी!

चेन्नई : रिओ पॅरालिम्पिकच्या उंचउडीत टी-४२ प्रकारात सुवर्णपदक विजेता मरियप्पन थंगवेलू याला तमिळनाडू सरकारने दोन कोटी रुपये बक्षीस देण्याची घोषणा केली.

### क्रीडा खात्याचे ७५ लाख!

पॅरालिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या खेळाडूला ७५ लाख, रौप्य जिंकणाऱ्याला ५0 तर कांस्यपदक जिंकणाऱ्याला ३0 लाख रुपये देण्यात येणार असल्याचे क्रीडा मंत्रालयाने यापूर्वीच जाहीर केले होते.



राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे की, हे यश मोठे गौरवास्पद आहे, यातून देशातील सर्व खेळाडूंना प्रेरणा मिळेल. अभिनंदन आणि शुभेच्छा !



मोदी यांनी ट्विट संदेशात या विजयाने देश गौरवान्वित झाला, असे म्हटले आहे. गोयल यांनी या दोन्ही खेळाडूंची मुक्तकंठाने पाठ थोपटली.



काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी म्हणाल्या, 'आज ऐतिहासिक दिवस आहे. दोन्ही खेळाडूंची अद्भूत कामगिरी भविष्यातील अनेक पिढ्यांना प्रेरणादायी ठरेल.'



तमिळनाडूच्या मुख्यमंत्री जे. जयललिता म्हणाल्या, 'थंगवेलू याने शारीरिक अपंगात्वर मात करीत राज्याचे आणि देशाचे नाव उंचावले. मरियप्पनची कामगिरी युवकांना प्रेरणादायी ठरेल. '

## अभिनंदनाचा वर्षाव

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय क्रीडामंत्री विजय गोयल यांच्यासह अनेक मान्यवरांनी रिओ पॅरालिम्पिकमध्ये उंचउडीत सुवर्ण आणि कांस्य विजेते भारतीय खेळाडू मरियप्पन थंगवेलू तसेच वरुणसिंग भाटी यांचे अभिनंदन केले आहे.

नेमबाज अभिनव बिंद्रा म्हणाला, 'मरियप्पन सुवर्ण विजेत्यांच्या क्लबमध्ये तुझे स्वागत आहे'.

रिओ ऑलिम्पिकच्या महिला कुस्तीत कांस्य विजेती साक्षी मलिक हिने लिहिले, 'हे दोन्ही खेळाडू अन्य खेळाडूंसाठी प्रेरणास्रोत आहेत. भारतात प्रतिभेची उणीव नाही. मरियप्पन व भाटी आपले शतश: अभिनंदन!!'

बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी तसेच बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी मरियप्पन थंगवेलू आणि वरुणसिंग भाटी यांच्या कामगिरीचे कौतुक केले. ममता बॅनर्जी यांनी ट्विट करीत दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन केले. नितीश कुमार यांनीही खेळाडूंची पाठ थोपटून भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

बॉलिवूडचा महानायक अमिताभ बच्चन यांनी या दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करीत भारतात पुन्हा एकदा उत्सवाचे वातावरण तयार झाल्याचे म्हटले आहे.

भारतीय हॉकी संघाचे माजी कर्णधार वीरेन रासकिन्हा यांनी यापेक्षा मोठी प्रेरणा असूच शकत नाही. मरियप्पनची कामगिरी फार मोठी असल्याची प्रतिक्रिया दिली.

बीजिंग ऑलिम्पिकचा कांस्य विजेता बॉक्सर विजेंदरसिंग म्हणाला, 'ऑलिम्पिकपदक विजेत्या सिंधू आणि साक्षी यांना देशाने जो सन्मान दिला तसाच रोख पुरस्कार व सन्मान मरियप्पन आणि भाटी यांना मिळावा, अशी अपेक्षा आहे.'

# लोकमत समूहातर्फे औरंगाबाद मॅरेथॉन

**औरंगाबाद :** तंदुरुस्तीसाठी धावणे हा जणू काही देशांत छंदच बनला आहे आणि त्याला ऐतिहासिक औरंगाबाद शहरही अपवाद नाही. धावण्याविषयी आणखी जागरूकता निर्माण व्हावी आणि तंदुरुस्तीचा संदेश नागरिकांत रुजवावा या उदात्त हेतूने लोकमत समूहातर्फे ११ डिसेंबर रोजी शहरातील सर्वात मोठ्या ठरणाऱ्या औरंगाबाद अर्ध मॅरेथॉनचे भव्यदिव्य आयोजन करण्यात येणार आहे.

हे आयोजन मॅरेथॉनप्रती उत्साह दाखवणारे, अनुभवी धावपटू, मनोरंजन म्हणून धावणारे आणि मॅरेथॉनमध्ये आपली कारकीर्द करु पाहणाऱ्या धावपटूंसाठी आहे.

नागरिकांत तंदुरुस्ती राहण्यासाठी प्रेरणा देण्याचा हा एक प्रयत्न आहे. फिटनेसचा संदेश देणारी ही अर्ध मॅरेथान ५ कि. मी.ची 'फन रन' (रन फॉर पॅशन), दहा कि. मी.ची पॉवर रन (प्राथमिक ते उच्च पातळीपर्यंत) आणि २१ कि. मी. अशी असणार आहे.

आयोजक या सुरेख संकल्पनेविषयी खूप उत्साहित असून, हे भव्यदिव्य आयोजन यशस्वी होईल याचा त्यांना विश्वास आहे. या आयोजनाविषयी रुचिरा दर्डा म्हणाल्या, ''औरंगाबादमधील नागरिक, खेळाडूंना फिटनेससाठी प्रेरणा मिळावी हा आमचा प्रयत्न आहे. अशा प्रकारच्या भव्यदिव्य मॅरेथॉन आयोजनामुळे वैयक्तिकपणे क्षमतेचा कस लागतो. क्रीडाप्रेमींना प्रेरित करुन त्यांनी सक्रियपणे फिटनेसवर लक्ष केंद्रित करावे आणि एक शिस्तबद्ध धावपटू कशाप्रकारे अद्भुत यश प्राप्त करु शकतो हे अर्ध मॅरेथॉनद्वारे दाखवणे हादेखील या आयोजनामागे उद्देश आहे.''




# जोकोविच-वावरिका जेतेपदासाठी झुंजणार

**न्यूयॉर्क :** जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या सर्बियाच्या नोव्हाक जोकोविचने लौकिकाला साजेशी कामगिरी करताना फ्रान्सच्या गाएल मोंफिल्सचा पराभव करीत यूएस ओपन टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. जोकोविचला जेतेपदासाठी स्वित्झर्लंडच्या स्टेनिसलास वावरिकाच्या आव्हानाला सामोरे जावे लागणार आहे. वावरिकाने दुसऱ्या उपांत्य लढतीत जपानच्या केई निशिकोरीचा पराभव केला.

आर्थर अॅश स्टेडियममध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या उपांत्य लढतीत गतविजेत्या जोकोविचने १० व्या मानांकित मोंफिल्सचा ६-३, ६-२, ३-६, ६-२ ने पराभव केला. मोंफिल्सला जोकोविचविरुद्ध कारकिर्दीतील १३ सामन्यांमध्ये एकदाही विजय मिळवता आला नाही.

२००८ मध्ये फ्रेंच ओपनच्या उपांत्य फेरीत धडक मारणारा मोंफिल्स ग्रॅण्डस्लॅम स्पर्धेत दुसऱ्यांदा उपांत्य फेरीत खेळत होता. कोर्टवर हेतुपुरस्सरपणे वेळकाढूपणाचे धोरण अवलंबनाऱ्या मोंफिल्सला प्रेक्षकांच्या हुटिंगलाही सामोरे जावे लागले.

जोकोविच या स्पर्धेत आतापर्यंत केवळ दोनच सामने खेळला. कारण त्याला एका प्रतिस्पर्धी खेळाडूंकडून वॉक ओव्हर मिळाला तर दोन खेळाडूंनी अर्ध्यावर लढतीतून माघार घेतली होती. यंदा ऑस्ट्रेलियन व फ्रेंच ओपन स्पर्धेत जेतेपद पटकावणाऱ्या जोकोविचला यूएस ओपनच्या जेतेपदासाठी तिसऱ्या मानांकित स्वित्झर्लंडच्या स्टेनिसलास वावरिकाच्या आव्हानाला सामोरे जावे लागणार आहे.

तिसऱ्या मानांकित वावरिकाने दुसऱ्या उपांत्य लढतीत सहव्या मानांकित निशिकोरीचा ४-६, ७-५, ६-४, ६-२ ने पराभव करीत अंतिम फेरीत स्थान मिळवले. निशिकोरीने यापूर्वी धक्कादायक निकालाची नोंद करताना जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेला व दोनदा ऑलिम्पिक चॅम्पियन ठरलेल्या ब्रिटनच्या अॅन्डी मरेचा पराभव करीत उपांत्य फेरीत स्थान मिळवले होते.

# नांदेड, लातूर संघ विजयी

**नांदेड : स्वामी** रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या आंतर महाविद्यालयीन विभागीय बास्केटबॉल स्पर्धेच्या साखळी लढतीत मुला-मुलींच्या गटात नांदेड व लातूर संघाने प्रतिस्पर्धी संघावर मात करुन आघाडी घेतली.

स्पर्धेत मुलांच्या गटात परभणी संघाने हिंगोलीवर २०-१० ने मात केली. दुसऱ्या लढतीत नांदेड संघाने परभणीचा ४७-१० असा एकतर्फी पराभव केला. तिसऱ्या लढतीत लातूर संघाने हिंगोलीवर २४-२ अशी सहज मात केली. नांदेड विरुद्ध हिंगोली या चौथ्या लढतीत नांदेड संघाने ४१-२ असा पराभव केला. लातूर विरुद्ध परभणी या शेवटच्या लढतीत लातूर संघाने परभणीचा २२-१२ असा पराभव केला. मुलींच्या गटात लातूर संघाने परभणीवर १२-६ असा विजय मिळविला. दुसऱ्या लढतीत नांदेड संघाने परभणीवर १२-३ अशी सहज मात केली. तत्पूर्वी, बास्केटबॉल स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे सचिव डॉ. कृ. म. जोशी यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रा. गणपत माने, प्रा. नंदू मेगदे, प्राचार्य डॉ. शिवणीकर, डॉ. एम. एन. रेड्डी यांची उपस्थिती होती.

स्पर्धेत पंच म्हणून प्रा. जयदीप कहाळेकर, हनुमंत सुरवसे, विष्णू शिंदे, सुहास कांबळे, डॉ. मनोज पैंजने, विनोद गोस्वामी काम पाहत आहेत. स्पर्धा यशस्वीतेसाठी क्रीडा संचालक डॉ. विठ्ठलसिंह परिहार, प्रा. गंदगे, डॉ. विक्रम कुंटूरवार, प्रा. काकडे, प्रा. ठाकूर आदी परीश्रम घेत आहेत. (क्रीडा प्रतिनिधी)

# ज्ञानोबा मुंढे महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस्, गाईडस्च्या अध्यक्षपदी



**औरंगाबाद : येथील** ज्ञानोबा मुंढे यांची महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस् संघटनेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. अध्यक्षपदाचा कालावधी हा पाच वर्षांचा असणार आहे. याआधीही ज्ञानोबा मुंढे हे दोन वेळेस उपाध्यक्ष होते व गेल्या २0 वर्षांपासून या चळवळीत ते सक्रिय आहेत. महाराष्ट्रात १५ लाख स्काऊट व गाईडस् असल्याचे मुंढे यांनी सांगितले. स्काऊट व गाईडस्मध्ये नैतिकता, देशप्रेम रुजवणे व सत्यनिष्ठेचे प्रशिक्षण दिले जाते. महाराष्ट्रात १५ लाखांपेक्षा जास्त स्काऊट व गाईडस् यांना चळवळीत आणणे, त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा आपला प्रयत्न असेल. प्रत्येक विभागवार ट्रेनिंग सेंटरचा विकास करणे, चळवळीला चांगली गती देऊन मुलांमध्ये देशप्रेमाची ज्योत प्रज्वलित करण्याचा व नीतिवान नागरिक निर्माण करण्याचा उद्देश आहे, असेही ज्ञानोबा मुंढे यांनी सांगितले.











